**श्री. सुभाष म. जाधव, निरीक्षक
(गट-ब), राज्य उत्पादन शुल्क
यांच्या पदस्थापनेबाबत...**

# महाराष्ट्र शासन

## गृह विभाग

**शासन आदेश क्रमांक : न्यायाप्र-४०१६/ प्र.क्र.१२/ राऊशु-१,**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : २२ सप्टेंबर, २०१७.

<u>वाचा</u> : १) गृह विभाग, शासन आदेश क्र. इएसटी-५०१५/ प्र.क्र. २५९/ राउशु-१, दि. १८.०७.२०१६

२) मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांचे दि. २०.०२.२०१७ चे आदेश.

३) गृह विभाग, शासन आदेश क्रमांक : न्यायाप्र-४०१६/ प्र.क्र.१२/ राऊशु-१, दि. १७.०७.२०१७

**<u>शासन आदेश:-</u>**

श्री. सुभाष महादेव जाधव, निरीक्षक (गट-ब), राउशु यांना संदर्भाधीन क्र. १ येथील दि.१८.०७.२०१६ च्या आदेशान्वये शासकीय सेवेतून निलंबित करण्यात आले होते. सदर निलंबन आदेशाविरूद्ध त्यांनी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल केलेल्या मुळ अर्ज क्र. १०१५/२०१६ मध्ये मा. न्यायाधिकरणाने दि. २०.०२.२०१७ च्या आदेशान्वये, शासनाचे संदर्भाधीन क्र. १ येथील निलंबन आदेश रद्दबातल ठरवून, त्यांना चार आठवड्याच्या आत पुन:स्थापित करण्याचे आदेश दिले आहेत.

२. मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या उपरोक्त आदेशाच्या अनुषंगाने, श्री. सुभाष महादेव जाधव, निरीक्षक (गट-ब), राउशु यांचे निलंबन संपुष्टात आणून, त्यांना संदर्भ क्र.३ येथील दि.१७.०७.२०१७ च्या आदेशान्वये न्यायालयीन प्रकरणाच्या अधीन राहून शासकीय सेवेत पुन:स्थापित करण्यात आले आहे. परंतु त्यांना पदस्थापना देण्यात आली नव्हती.

३. पुन:स्थापनेनंतर श्री. सुभाष महादेव जाधव, यांची पदस्थापना निरीक्षक, राउशु, भरारी पथक - २ ठाणे या ठिकणी करण्यात येत आहे.

४. सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१७०९२२१६४७१३६२२९ असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Punam Hiraman Wagde

Digitally signed by Punam Hiraman Wagde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=26d7295f0f289d96eecb9e12c2850ebd4f894edc0ea69760a3c1561515a6bf87, cn=Punam Hiraman Wagde
Date: 2017.09.22 16:35:38 +05'30'

**( पु.हि.वागदे )**
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. महालेखापाल-१ (लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई,
३. विभागीय उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, कोकण विभाग, ठाणे.
४. जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई उपनगरे.
५. संचालक, (अं. व द.), राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. संबंधित अधिकारी (मार्फत आयुक्त, राउशु, मुंबई.)
७. निवडनस्ती (राउशु-१)

**प्रत माहितीस्तव**

१. मा. मंत्री (राउशु) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री (राउशु) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. प्रधान सचिव (राउशु) यांचे वरीष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.